# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६**

## सामान्य प्रशासन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ए-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- ९,०६,८२,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ११५३ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र विधानसभेतील सर्वाधिक काळ आमदार म्हणून कार्य केलेले स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांनी आपल्या आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी कार्य केले. त्यांच्या साधेपणामुळे व जनतेशी असलेल्या घट्ट नात्यामुळे ते महाराष्ट्रातील आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांनी तब्बल अनेक दशके सांगोला मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना तसेच शिक्षण, शेती, पाणीपुरवठा, रस्ते व ग्रामीण विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान व पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने सांगोला शहरात त्यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्यासाठी शासनामार्फत तात्काळ कार्यवाही करून निधीची तरतूद करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ए-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- २,१४,७३,१३,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | ११६१ | १० | महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादाच्या आंदोलनात अनेक मराठी बांधवांनी आपल्या हक्कांसाठी लढताना बलिदान दिले. या हुतात्म्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या व मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी मोठा त्याग केला आहे. त्यांच्या या अमूल्य योगदानामुळे महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात त्यांचे स्थान अत्यंत गौरवपूर्ण आहे. सदर हुतात्म्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून मासिक पेन्शन व काही आर्थिक लाभ दिले जात असले तरी सध्याच्या वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर ही रक्कम अपुरी ठरत आहे, त्यामुळे हुतात्म्यांच्या वारसांना अधिक सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी शासनाने त्यांच्या मासिक पेन्शनमध्ये वाढ करणे व इतर आर्थिक लाभही वाढविणे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक आहे.तरी महाराष्ट्र–कर्नाटक सीमावादातील हुतात्म्यांच्या वारसांना दिली जाणारी मासिक पेन्शन लक्षणीय वाढवून देण्याबरोबरच त्यांना अतिरिक्त आर्थिक मदत व इतर कल्याणकारी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामान्य प्रशासन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई